अमृतमहोत्सवी

स्थापना १९३९

७५

अमृतमहोत्सवी दैनिक

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

ली

दि. १६ सप्टेंबर २०१४ | वर्ष ७६ | मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसि

## किर्लोस्कर- वसुंधरा चित्रपट महोत्सव किर्लोस्करवाडीत सुरू

**किर्लोस्करवाडी : प्रतिनिधी**

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्कर क्लब व वसुंधरा महोत्सव यांच्यातर्फे आजपासून येथे किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू झाला. हा महोत्सव सर्व नागरिकांसाठी मोफत असून प्रतिनिधी नोंदणीला उत्साही प्रतिसाद मिळत आहे, असे वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष रवी सिन्हा, प्रकाश पुदाले, सुभाष पाटील व डॉ. राजन कामत, विजय शिंदे यांनी दिली.

महोत्सवासाठी नोंदणी आजपासूनच सोशल क्लब येथे सुरु झाली आहे. पाचव्यांदा होत असलेल्या या महोत्सवाचे यजमानपद किर्लोस्कर ब्रदर्स उद्योग समुहाकडे आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन सोमवारी सायंकाळी ५.३० वाजता सोशल क्लब येथे डॉ. प्रियदर्शनी कर्व्हे, प्रकाश पुदाले यांच्या हस्ते झाले. या महोत्सवाच्या उद्‌घाटनापूर्वी छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. महोत्सवामध्ये अरुण सावंत (सावंतपूर), अशोक लकडे यांना 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने तर विश्वंभर चौधरी यांना 'वसुंधरा सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मंगळवारी (दि. १६)सकाळी पर्यावरण जागृतीसाठी सायकल फेरी येथे निघणार आहे. दुपारी एएससी कॉलेज पलूस येथे विद्यार्थ्यांसाठी विविध फिल्मस् दाखवण्यात येतील. संध्याकाळी सोशल क्लब येथे ६ ते ८ या वेळेत नागरिकांसाठी फिल्मस् दाखवण्याचा कार्यक्रम आहे.

## कार्वे शाळेचे यश

**विटा : वार्ताहर**

भवानीनगर येथे झालेल्या शालेय व ग्रामीण पायका खो-खो स्पर्धेत १६ आणि १७ वर्षाखालील गटात कार्वेच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक सी.एच. निकम, एम.ए. घाडगे यांनी अभिनंदन केले.

स्थापना १९३९
७६
अमृतमहोत्सवी दैनिक
अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
ली
। दि. १६ सप्टेंबर २०१४ । वर्ष ७६ । मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसि

# किर्लोस्कर- वसुंधरा चित्रपट महोत्सव किर्लोस्करवाडीत सुरू

**किर्लोस्करवाडी : प्रतिनिधी**

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड, किर्लोस्कर क्लब व वसुंधरा महोत्सव यांच्यातर्फे आजपासून येथे किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सुरू झाला. हा महोत्सव सर्व नागरिकांसाठी मोफत असून प्रतिनिधी नोंदणीला उत्साही प्रतिसाद मिळत आहे, असे वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष रवी सिन्हा, प्रकाश पुदाले, सुभाष पाटील व डॉ. राजन कामत, विजय शिंदे यांनी दिली.

महोत्सवासाठी नोंदणी आजपासूनच सोशल क्लब येथे सुरू झाली आहे. पाचव्यांदा होत असलेल्या या महोत्सवाचे यजमानपद किर्लोस्कर ब्रदर्स उद्योग समुहाकडे आहे. महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी सायंकाळी ५.३० वाजता सोशल क्लब येथे डॉ. प्रियदर्शनी कर्व्हे, प्रकाश पुदाले यांच्या हस्ते झाले. या महोत्सवाच्या उद्घाटनापूर्वी छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. महोत्सवामध्ये अरुण सावंत (सावंतपूर), अशोक लकडे यांना 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने तर विश्वंभर चौधरी यांना 'वसुंधरा सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मंगळवारी (दि. १६)सकाळी पर्यावरण जागृतीसाठी सायकल फेरी येथे निघणार आहे. दुपारी एएससी कॉलेज पलूस येथे विद्यार्थ्यांसाठी विविध फिल्मस् दाखवण्यात येतील. संध्याकाळी सोशल क्लब येथे ६ ते ८ या वेळेत नागरिकांसाठी फिल्मस् दाखवण्याचा कार्यक्रम आहे.

## कार्वे शाळेचे यश

**विटा : वार्ताहर**

भवानीनगर येथे झालेल्या शालेय व ग्रामीण पायका खो-खो स्पर्धेत १६ आणि १७ वर्षाखालील गटात कार्वेच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक सी. एच. निकम, एम. ए. घाडगे यांनी अभिनंदन केले.